नि.दि.दा.क्र.१०१/२०१८
नि.क्र.९२

**Order below Exh.92 in RCS No.101/2018**

Defendant No.1 and its advocate remained absent when repeatedly called till 11.45 pm. Defendant No.1 failed to conduct cross examination. No adjournment has been sought. Hence, suit to proceed without cross examination of this witness by defendant No.1.

Digitally signed by ASHISH BIHARILAL MARLECHA
Date: 2025.11.01 16:15:40 +0530

(Ashish B. Marlecha)
Civil Judge Senior Division,
Shrirampur, Dist. A.Nagar.

Date : 01/11/2025

**उलटतपास प्रतिवादी क्र.२ करीता विधिज्ञ श्री. डी.डी. औताडे यांच्यावतीने तहकूब.**

२. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील आणि वादी व प्रतिवादी क्र.२ यांचे एकत्र कुटूंब आहे. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या कुटूंबादरम्यान दावा मिळकती संदर्भात लेखी वाटप झालेले नाही. लेखी वाटपा संदर्भातील दस्त आम्ही या दाव्यात दाखल केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या तडजोडी संदर्भात न्यायालयात रे.द.क्र.२६/२०१९ ही दरखास्त प्रलंबित आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या दरखास्तमध्ये मिळकतीच्या मुल्यांकनावरुन प्रतिवादी क्र.२ यांनी वाद उपस्थित केले. हे म्हणणे खरे आहे की, झालेली तडजोड ही प्रत्यक्षात अमलात आलेली नाही.

३. दावा मिळकती संदर्भात जे काही पत्रव्यवहार, तक्रारी आणि इतर दस्त लिहिण्यात व नोंदविण्यात आले, त्या बाबत मला संपूर्ण माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.१ यांनी दाखल केलेल्या एस.सी.सी. केस क्र.२२२/२०१६ या फौजदारी प्रकरणात मी आरोपी क्र.२ म्हणून समाविष्ट आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे आजोबा मयत असतांना मी त्यांच्या नावाने प्रतिवादी क्र.१ यांच्याकडे बांधकाम परवानगी करीता अर्ज सादर केल्याचे कारणावरुन प्रतिवादी क्र.२ यांनी माझ्याविरुध्द

आर.सी.सी.क्र.२७८/२०१३ ही फौजदारी केस दाखल केली.

४. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत खरेदी घेतेवेळेस त्यावर कोणतेही स्वरुपाचे पक्के बांधकाम नव्हते. दावा मिळकत खरेदी घेतेवेळेस त्यावर कोणतेही स्वरुपाचे पक्के बांधकाम होते हे दाखविण्याकरीता मी कागदोपत्री पुरावा दाखल केला आहे. माझ्या म्हणण्याप्रमाणे दावा मिळकती संदर्भात तडजोड झाल्याने प्रतिवादी क्र.२ यांचा दावा मिळकतीशी संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, १९८८ साली गंगुबाईने बांधकाम परवानगी घेतल्यानंतर दावा मिळकतीवर कोणतेही बांधकाम केले नव्हते. मिळालेल्या तथाकथीत परवानगीप्रमाणे गंगुबाईने दावा मिळकतीवर बांधकाम पूर्ण केल्याबाबतचे प्रमाणपत्र मी पाहिलेले नाही.

५. माझ्या म्हणण्याप्रमाणे वादीने दावा मिळकतीच्या बांधकामामध्ये कोणतेही बदल केलेले नाही.

**<u>प्रश्न</u>** – दावा मिळकतीमध्ये दुरुस्ती होऊन मिळण्याकरीता तुम्ही प्रतिवादी क्र.१ यांच्याकडून तशी परवानगी घेतली होती का ?

**<u>उत्तर</u>** – आम्ही दि.०४/०८/२०१८ रोजी प्रतिवादी क्र.१ यांच्याकडे परवानगी मिळण्याकरीता अर्ज सादर केला होता.

त्या अर्जावर काय आदेश झाले याबाबत प्रतिवादी क्र.१ यांनी आम्हांला कळविलेले नाही. मी स्वतः त्या अर्जावर काय आदेश झाले याबाबत माहिती घेतलेली नाही. शपथपत्रातील मजकूर मी दिलेल्या माहितीप्रमाणे तयार करण्यात आले. हे म्हणणे खरे नाही की, गंगुबाई पुजारी हिने घेतलेल्या बांधकाम परवानगीनूसार वादीने दावा मिळकतीमध्ये बांधकाम केल्याचे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूराचे मी खोटे कथन केले व सरतपसातील संपूर्ण मजकूर वादीने सांगितल्याप्रमाणे तयार करण्यात आला. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तूतच्या वादाबाबत कसलीही वैयक्तीक माहिती नसतांना वादीला मदत करण्याच्या उद्देशाने मी पुराव्याचे खोटे प्रतिज्ञापत्र दाखल केले व खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास पूर्ण.</u>**

**<u>फेरतपास नाही.</u>**

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by ASHISH BIHARILAL MARLECHA
Date: 2025.11.01 16:15:47 +0530

(आशिष बि. मरलेचा)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
श्रीरामपुर, जि.अहमदनगर

दिनांक ०१/११/२०२५